नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६२ Issue - 62 | वार शनिवार दि. १९ जुलै २०२५ Blow- Saturday Date 19 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पावसाळी अधिवेशनात १६ विधेयके मंजूर

### अधिवेशनाचा समारोप; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पावसाळी अधिवेशनाचा समारोप झाला आहे. अधिवेशनात १६ विधेयकं आम्ही पास केली असल्याचे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल. पावसाची कामगिरी दमदार आहे तशीच आमच्या सरकारची देखील दमदार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. सरासरीपेक्षा अधिक पाऊस आता पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. पंचनामे करण्याचे आदेश दिलेत, काही भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकसान झालेल्यांना पैसे वाटप करतोय. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.




जनसुरक्षा विधेयक यासंदर्भात अनेक अफवा पसरवण्यात आल्या

एससीएसटी समाजाच्या आयोगांना वैधानिक दर्जा दिला आहे. जनसुरक्षा विधेयक यासंदर्भात अनेक अफवा पसरवण्यात आल्या आहेत. सगळ्या बैठका समितीच्या खेळीमेळीत पार पडल्या. ज्या सुराधणा सुचवल्या त्याच क्षणी त्या स्वीकारल्याचे फडणवीस म्हणाले. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आपण केलं आहे. गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक मंजूर केलं आहे. मकोकात आता नार्कोटिक्स घेण्याचे देखील ठरवले आहे. पुरवणी मागण्यांना मान्यता देण्यात आली असल्याचे फडणवीस म्हणाले.

दिव्यांगांसाठी आता अडीच हजार रुपये देण्याचा निर्णय

राज्य सरकारनं दिव्यांगांसाठी आता अडीच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शिक्षकांना देखील अनुदान दिले आहे. तसेच भूषण गवईंचा यांचे देखील सत्कार आपण केला आहे. अनुकंपाची यादी समाप्त करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला आहे. संत सावता महाराज समाधी मंदिर विकासासाठी मान्यता देण्यात आली आहे. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं देण्यात आली असल्याचे फडणवीस म्हणाले.

सत्तारुढ पक्ष म्हणून झालेल्या काम काजावर आम्ही समाधानी

सत्तारुढ पक्ष म्हणून झालेल्या काम काजावर आम्ही समाधानी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्याची पुढची वाटचाल कशी असणार याबाबतही चर्चा झाली. मात्र, हे खरे आहे की, काही गोष्टी अशा घडल्या की, त्या गोष्टीचं आम्हाला देखील दु:ख आहे. अशा गोष्टी घडू नये म्हणून भविष्यात काळजी घेतली जाईल असे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांनी कोणतेही पुरावे न देता आरोप केला. आरोप करायचे आणि त्यातून बाजूला व्हायचे ही विरोधकांची भूमिका होती असे फडणवीस म्हणाले.

## निवडणूक जाहीर झाल्यावर राज ठाकरेंसोबत चर्चा करु : उद्धव ठाकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अनेक वर्षांनंतर आम्ही दोघे व्यासपीठावर एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी असं सूचक वक्तव्य शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं. आज कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही, झाली तर चर्चा करु शकतो, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरेंनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सरकारवरही हल्लाबोल केला.

मी स्वत: पिककर्ज मुक्तीची घोषणा केली होती. आम्ही सुरु केलं तेव्हा सरकार पाडलं गेलं. मी अनुभव नसताना पहिल्या अधिवेशनात केलं, तुम्ही मंत्री आहात, खाती असतात, अभ्यास कसला करत आहात कर्जमुक्तीसाठी असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

माझा चेहर हसराच असतो, मी रेडा कुठे कापला नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले. आज अधिवेशन संपत आहे. ३ आठवड्याचं अधिवेशन होतं. जनतेच्या समस्या संदर्भात प्रश्न होते. मुख्यमंत्र्याचं भाषण कसं होतं, आईला मुलगा म्हणतो आईस्क्रिम हवं आहे. आता काही होत नाही भविष्यात हे होईल असे म्हणत ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना टोला लगावला. पुरवण्या मागण्यावर जास्त भर दिला. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. हे कर्ज फेडणार कसं? कर्ज कमी कसं करणार? योजनाचं काय लाडका भाऊ बहिण याची उत्तर नाहीत असे ठाकरे म्हणाले.

सत्तेच्या लालसेपोटी राजकारण सुरु

कालच विधानभवनात हाणामारी झाली, अध्यक्षांनी उच्चस्तरिय चौकशी नेमली आहे. या गुंडांची इतकी हिंमत झाली आहे. कारवाई एकायला चांगली आहे, मात्र धाडस झालं कसं? असा सवाल ठाकरेंनी केला. सत्तेच्या लालसेपोटी हे राजकारण सुरु आहे. हे सत्तेच माजकारण आहे असे ठाकरे म्हणाले. चड्डी गँग माईक टाईसन समजतात. गळ्यात दात घालून फिरणारे कसे माजलेत. यांना कोणी जाब विचारणार की नाही असे ठाकरे म्हणाले.

३ हजार कोटींची चोरी सुप्रीम कोर्टान पकडली तरी चोर फिरतोय

पीक विमा रद्द केला आहे. ३ हजार कोटींची चोरी सुप्रीम कोर्टान पकडली तरी चोर फिरतोय असे ठाकरे म्हणाले. विधानभवनात अशा घटना घडत असतील तर राष्ट्रपती राजवट लागू करावी असे ठाकरे म्हणाले. याला मी स्वप्न रंजन वाटीका म्हणतो. विरोधी पक्षनेता पाशवी बहुमत असताना देत नाही. अल्पमतातलं सरकार मांडता येत नाही. व्यक्तीस्वातंत्र्य असल्याने त्रिभाषा सूत्र आणत आहे. मात्र, आम्ही तो आणून देणार नाही. मुख्यमंत्र्यांनी मराठी नीट वचायला हवी. राष्ट्रीय शैक्षणीक धोरण २०२० वाचून दाखवत आहेत असे ठाकरे म्हणाले.

## ...तर दुकानंच नाही तर शाळाही बंद करू; राज ठाकरेंचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : महाराष्ट्रातील शाळेत शासनाने इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्राची सक्ती केल्यावरुन मुंबईसह महाराष्ट्रात मनसैनिकांनी या निर्णयाला मोठा विरोध केला. त्यावरुन, राज्यात सुरू असलेल्या वादाचे पडसाद हिंदी विरुद्ध मराठी असे पाहायला मिळाले. येथील मिरा भाईंदरच्या जोधपुर स्वीट आणि नमकीन दुकान मालकाला मनसे सैनिकांनी मारहाण केल्यानंतर मिरा रोडमध्ये मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाला होता. त्यानंतर, मराठी व अमराठी असे मोर्चे मिरा भाईंदरमध्ये निघाल्याचं महाराष्ट्राने पाहिलं. एकीकडे मराठीच्या मुद्द्यावर ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर मिरा भाईंदरमध्ये मराठी एकीकरण समितीच्यावतीने काढण्यात आलेल्या मोर्चालाही मोठा प्रतिसाद मिळालं. त्यानंतर, आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मिरा रोड येथे जाऊन जाहीर सभा घेतली. सभेच्या सुरुवातीलाच राज ठाकरेंनी मराठीच्या मुद्द्यावरुन थेट मुख्यमंत्र्यांना इशारा दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं म्हणे की, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषासूत्री आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. मग, सरकारला आत्महत्या करायचीच असेल तर करा. पण, महाराष्ट्रात इयत्ता १ लीपासून



हिंदी सक्तीची करण्याचा तुम्ही फक्त प्रयत्न तर करून बघा, दुकानंच नाही तर शाळाही बंद करू, असा इशाराच राज ठाकरेंनी मिरा भाईंदर येथील सभेतून दिला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडता, कोणाच्या दबावाखाली, तुमच्यावर कोण दबाव टाकत आहे? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. तसेच, केंद्र सरकारकडून हा दबाव पहिल्यापासून टाकला जात आहे, काँग्रेस सरकार असतानाही तोच दबाव टाकला होता, असे म्हणत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा दाखला राज ठाकरेंनी दिला.

मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा डाव होता, गुजराती व्यापारी आणि गुजराती नेत्यांचा होता. आचार्य अत्रे यांचे पुस्तक वाचत असताना मला कळले, ज्या ज्या वेळेस महाराष्ट्रात आंदोलन झाले, मोरारजी देसाई यांनी गोळ्या घालून मराठी लोकांना ठार मारले. यांचा मुंबईवर डोळा आहे, हे तुम्हाला चाचपडून बघत आहेत. हिंदी भाषा आणली तर बघू मराठी माणूस जिवंत आहे का, जर तो शांत दिसला तर हिंदी भाषा आणायचा पहिला प्रयत्न असेल, हळू हळू मुंबई गुजरातला मिळवायची हा यांचा प्रयत्न आहे. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये, हे सर्वप्रथम वल्लभभाई पटेल यांनी म्हटलं होतं, असा इतिहासही राज ठाकरेंनी सांगितला.


स्वीटमार्टचं दुकान बंद, पोलिसांचा तगडा बंदोबस्त

दरम्यान, मिरा भाईंदरच्या राज ठाकरे यांच्या येण्याचं कारण येथील स्वीट मार्ट दुकानातील घटनेनंतर घडलेल्या घडामोडी आहेत. राज ठाकरे येणार असल्याने त्या दुकानदाराने आज दुपारच्या नंतरच आपलं दुकान बंद केलं आहे. या दुकानाच्या जवळच अगदी ३०० मीटर अंतरावर राज ठाकरेंची ही सभा झाली. राज ठाकरे यांच या दुकानाच्या समोर बालाजी कॉर्नर चौक येथे जंगी स्वागत झालं. त्याच अनुषंगाने खबरदारी घेत या दुकान मालकांन आपलं दुकान बंद ठेवलेल्याचं पाहायला मिळालं. दुसरीकडे मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाने येथे तगडा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

## अनाथ बालकांना व्यावसायिक शिक्षण मोफत : ना. तटकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आता अनाथ बालकांना व्यावसायिक शिक्षण मोफत घेता येणार आहे. ज्या अनाथ बालकांचे/ कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के लाभ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



अनाथ विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत लागू असून, वार्षिक उत्पन्न ८ लाखांपर्यंत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना ही सवलत मिळेल. ही योजना सर्व संस्थांतील नव्याने प्रवेश घेतलेल्या व सध्या शिकत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (उशपींरश्र- ळूशव वाळीीळेप झीलशीी-उझ) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनाथ बालकांना नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) अनाथ बालकांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के लाभ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. अनाथ मुलांना योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू राहील, असेही त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झाला करार**

**महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार**

## ऊर्जा क्षेत्रातील संशोधन व सहकार्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाचा कॅलिफोर्निया विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बर्कले येथील जागतिक कीर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाशी महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास क्षेत्रातील सहकार्यासंबंधी सामंजस्य करार केला आहे. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी, महापारेषणचे संजीव कुमार आदी उपस्थित होते. श्रीमती शुक्ला आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

या करारामुळे महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार आहे. उर्जेचा स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारा पुरवठा, ऊर्जा साठवणूक उपाय, वीज बाजार रचना, ग्रीड प्रसारण प्रणालीतील सुधारणा, हवामानाशी जुळवून घेणारी धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम या क्षेत्रांमध्ये संयुक्त काम होणार आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात उर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवसंशोधनाला चालना मिळेल. या सामंजस्य करारामार्फत उर्जा साठवणूक, वीज बाजार, प्रसारण व्यवस्था आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन, ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धी यांना चालना मिळणार आहे. स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने सहकार्याचा नवा अध्याय सुरू होत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र सरकार आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले यांच्यातील हे सहकार्य परस्पर विश्वास, समानता आणि सामूहिक हिताच्या तत्त्वांवर आधारित असून, राज्याच्या उर्जा क्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार स्थानिक उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

हा करार लवचिक स्वरूपाचा असून त्यामुळे भविष्यातील प्रकल्पांनुसार सहकार्याचे दरवाजे खुले राहतील. या करारामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रशासन यांना नवसंशोधन, क्षमता वृद्धी व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. त्यामुळे पर्यावरणस्नेही आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने राज्याचा प्रवास अधिक गतिमान होईल, असा विश्वास ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी व्यक्त केला.

या सामंजस्य करारामध्ये खालील महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये ज्ञानसंपादन, संशोधन आणि प्रशिक्षणाची संधी मिळणार

स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या वीजेचा विकास

उर्जा साठवण तंत्रज्ञानावर संयुक्त संशोधन

वीज मार्केटची रचना आणि धोरण निर्मिती

ग्रीड प्रसारण क्षेत्रातील नवोन्मेष

हवामान अनुकूलता (लश्रळारींश ीशीळश्रळशपलश) उपाययोजना

कौशल्यविकास आणि प्रशिक्षण उपक्रम

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### 'त्रिभाषा'वरून वाद

महाराष्ट्रातील शाळेत शासनाने इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्राची सक्ती केल्यावरुन मुंबईसह महाराष्ट्रात मनसैनिकांनी या निर्णयाला मोठा विरोध केला. त्यावरुन, राज्यात सुरू असलेल्या वादाचे पडसाद हिंदी विरुद्ध मराठी असे पाहायला मिळाले. येथील मिरा भाईंदरच्या जोधपुर स्वीट आणि नमकीन दुकान मालकाला मनसे सैनिकांनी मारहाण केल्यानंतर मिरा रोडमध्ये मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाला होता. त्यानंतर, मराठी व अमराठी असे मोर्चे मिरा भाईंदरमध्ये निघाल्याचं महाराष्ट्राने पाहिलं. एकीकडे मराठीच्या मुद्द्यावर ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर मिरा भाईंदरमध्ये मराठी एकीकरण समितीच्यावतीने काढण्यात आलेल्या मोर्चालाही मोठा प्रतिसाद मिळालं. त्यानंतर, आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मिरा रोड येथे जाऊन जाहीर सभा घेतली. सभेच्या सुरुवातीलाच राज ठाकरेंनी मराठीच्या मुद्द्यावरुन थेट मुख्यमंत्र्यांना इशारा दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं म्हणे की, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषासूत्री आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. मग, सरकारला आत्महत्या करायचीच असेल तर करा. पण, महाराष्ट्रात इयत्ता १ लीपासून हिंदी सक्तीची करण्याचा तुम्ही फक्त प्रयत्न तर करून बघा, दुकानंच नाही तर शाळाही बंद करू, असा इशाराच राज ठाकरेंनी मिरा भाईंदर येथील सभेतून दिला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडता, कोणाच्या दबावाखाली, तुमच्यावर कोण दबाव टाकत आहे? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. तसेच, केंद्र सरकारकडून हा दबाव पहिल्यापासून टाकला जात आहे, काँग्रेस सरकार असतानाही तोच दबाव टाकला होता, असे म्हणत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा दाखला राज ठाकरेंनी दिला. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा डाव होता, गुजराती व्यापारी आणि गुजराती नेत्यांचा होता. आचार्य अत्रे यांचे पुस्तक वाचत असताना मला कळले, ज्या ज्या वेळेस महाराष्ट्रात आंदोलन झाले, मोरारजी देसाई यांनी गोळ्या घालून मराठी लोकांना ठार मारले. यांचा मुंबईवर डोळा आहे, हे तुम्हाला चाचपडून बघत आहेत. हिंदी भाषा आणली तर बघू मराठी माणूस जिवंत आहे का, जर तो शांत दिसला तर हिंदी भाषा आणायचा पहिला प्रयत्न असेल, हळू हळू मुंबई गुजरातला मिळवायची हा यांचा प्रयत्न आहे. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये, हे सर्वप्रथम वल्लभभाई पटेल यांनी म्हटलं होतं, असा इतिहासही राज ठाकरेंनी सांगितला.

# आपलं पोट भरणार कधी?(माणसाने किती भ्रष्ट वागायचं?)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(टीप. मी हे जे काही लिहीत आहे ते वैयक्तिक कोणी एक व्यक्ती, संस्था किंवा समाज याला उद्देशून लिहिलेलं नाही. कृपा करून सर्वांनी याची नोंद घ्यावी. तसेच काही आपल्या जाणकारांना मी नकारात्मक लिखाण करत आहे असं वाटत असेल पण हे वास्तव आहे. आपल्या आसपास ९०% असंच घडत असतं हे कोणीच नाकारू शकत नाही.)

आपला भारत देश हा अनादी काळापासून असंख्य लोकांच्या असीम त्यागावर, सर्वोच्च बलिदानावर आज पर्यंत सुरक्षित राहिलेला आहे. या देशावर निस्वार्थ प्रेम करणारी अनेक देशप्रेमी मंडळी या देशांमध्ये होऊन गेली. त्यांनी आपल्या कृतीतून या देशाला वेळोवेळी दिशा देण्याचे,मार्गदर्शन करण्याचे महान कार्य केले. हे सारं करत असताना त्यांनी आपल्या वैयक्तिक सुखदुःखांना बाजूला ठेवलं. आपल्या स्वतःच्या घराच्या भिंती पाडून टाकून साऱ्या भारत देशाला आपलं घर मानलं. आणि ते सतत जनसेवेसाठी झिजत राहिले. आजही काही मंडळी या देशासाठी, देशातील सर्वसामान्य माणसांसाठी सतत लढा देत असतात. पण याचे प्रमाण खूपच कमी आहे.

आपला हा समाज, हा देश असंख्य समाजसेवकांच्या, हुतात्म्यांच्या बलिदानातून स्वतंत्र झालेला आहे आणि आपण भ्रष्ट वागून या स्वतंत्र देशाला परत आर्थिक पारतंत्र्याकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहोत. आपल्या स्वतःच्या हिमतीवर, स्वतःच्या कष्टावर,स्वतःच्या ज्ञानावर कितीही कमवा तो स्वाभिमान वेगळा असतो. त्या पैशांमध्ये त्यांनी आपली कोणत्याही प्रकारची हौस मौज करण्यास ते पात्र असतात. पण सार्वजनिक संपत्तीवर डल्ला मारून राजरोसपणे मौज मजा करणारी मंडळी आज आपल्या अवतीभोवती खूप आढळतात. या भ्रष्ट वृत्तीच्या चंगळवादी माणसांना खतपाणी कोण घालतोय याचा विचार होणे गरजेचे आहे.एखाद्याने सवलत घ्यायची तरी किती? सरकारी नोकरदार अथवा खाजगी संस्थेमध्ये मोठ मोठ्या पदावर काम करणारे मंडळी गाडीमध्ये बोगस अपंग सवलत तिकीट काढून फिरतात. खरोखरच अपंग असेल तर ठीक आहे पण ९०% मंडळी खोटा दाखला काढून फिरतात. आपल्याला जेमतेम पगार असेल तर ठीक आहे पण तुम्ही लाखान पगार घेता अन पुन्हा सवलतीची अपेक्षा करता?कुठे गेली नीतिमत्ता? माणसाचा स्वभाव हा अनुकरणीय आहे.आपल्या जवळचा चांगला वागला तर आपण चांगलं वागतो, तो भ्रष्ट वागला तर आपल्या मनामध्ये आपणही भ्रष्ट वागलं तर काय फरक पडतो हा विचार जागा होतो. कितीतरी गोर गरीबाच्या सरकारी योजनावर अनेक श्रीमंत मंडळी डल्ला मारून मोकळे झालेले आहेत. मग गरीबाच्या पदरात काहीच पडत नाही. तळे राखील तो पाणी चाखेल. ही वृत्ती आपणामध्ये बळावत आहे .अनेक सरकारी योजना या खोट्याचं खरं आणि खऱ्याचं खोटं करून श्रीमंत मंडळी, चलाख मंडळी हडपली आहेत. मग गरिबांनी करायचं काय? आपल्या या अप्पल पोटी स्वभावामुळे आपण कळत नकळत गरिबांच्या वाट्याला येणाऱ्या हक्कावर पाय देत आहोत. प्रत्येक गोष्टीमध्ये स्वतःच ओरबाडून खाण्याची गिधाडघाई आपणास लागली आहे. सरकारकडून एखादी योजना , एखादे अनुदान येते ते फक्त मला आणि माझ्या नातलगांना, जवळच्या माणसांनाच मिळालं पाहिजे ही वृत्ती बळावत आहे. ज्यांच्या हातामध्ये समान योजना व वाटप करण्याची जबाबदारी असते असे किती तरी राजकारणी मंडळी देखील कोट्यावधी रुपयांचा प्रकल्प हे कागदोपत्री अथवा निकृष्ट दर्जाचे बांधकाम करून कोट्यावधी रुपये सार्वजनिक संपत्तीतून कमावण्याचे पाप करत आहेत. अनेक सरकारी कार्यालयामध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी हे गोरगरीब ग्राहकाकडून चिरीमिरी घेतात.(अनेकांनी लाच घेतलेले वेळोवेळी पेपरला बातमी येते)काही ठिकाणी तर ज्ञानदान करणारे, पुढची पिढी घडवणारे शिक्षक देखील मुलांचे गणवेश,शालेय पोषण आहार यामध्ये देखील पैसे खात असतात. यातून अशा या नीच नराधाम माणसांच्या अप्पलपोटी पणाचा कळस दिसून येतो. अनेक शासकीय कार्यालय,रस्ते, झाडे लावणे यासह अनेक योजना करण्यासाठी जबाबदार असणारे माणस ही वरील सर्व कामे निकृष्ट दर्जाचे करून त्यातून स्वतःची तुंबडी भरून घेण्याचा प्रयत्न करत असतात. अशा वृत्तीच्या माणसांचे पोट कधी भरणार आहे की नाही? अशी ही मंडळी आपल्या देशाला आर्थिक गुलामीच्या खाईमध्ये टाकूनच शांत बसतील. अनेकांना सरकारी कामांमधील टक्केवारीचा हाव सुटला आहे. तो हाव इतका आहे की, पुढार्याकडे वशिला लावून एखादं कामाचा टेंडर मिळवून घ्यायचं आणि ते टक्केवारी घेऊन दुसऱ्या ठेकेदारला विकायचं. हा कुठला भ्रष्ट प्रकार लागू होत आहे? बर ते काम टक्केवारी घेऊन एकटाच विकतोय असंही नाही.त्याच्याकडून जो ते काम घेतो तो देखील मला यातून खूप मिळालं पाहिजे ही अपेक्षा ठेवून काम करत असतो. मग ते काम निकृष्ट दर्जाचं होतेच पण कळत नकळत आपली राष्ट्रीय संपत्ती नाश पावत असते. अशी ही अप्पलपोटी आणि राक्षसी वृत्तीची माणसं ही सर्व क्षेत्रात विखुरली गेलेली आहेत. आपल्या माणसांच्या मूलभूत गरजा कोणत्या तर अन्न, वस्त्र,निवारा, मुलांचे शिक्षण .या प्राथमिक गरजा पूर्ण करून, आपण या जगात येऊन आपलं स्वतःचं काहीतरी निर्माण करायला हवं.. उदाहरणार्थ. एखादं घर, प्लॉट, शेती घेणे यात काही गैर नाही. स्वतःच्या कमाईतून त्याला घेण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि हक्क आहे.पण भ्रष्ट मार्गाने पैसा कमवून तो अवाच्या सव्वा खरेदी करत सुटला आहे. त्यामुळे जागेच्या, शेतीच्या, इतर वस्तूच्या किमती भरमसाठ वाढत आहेत. त्यामध्ये कळत नकळत भरडला जात आहे तो असंघटित कामगार, गोरगरीब मजूर, अल्पभूधारक शेतकरी. या साऱ्या राक्षसी वृत्तीमुळे तो ना स्वतःचे घर घेऊ शकतो,ना आपल्या लेकरा बाळांचे स्वप्न पूर्ण करू शकतो .आजकाल समाजामध्ये काही काही महाभाग हे असे आहेत की, सारे फक्त मलाच मिळू दे. नव्हे दुसऱ्याच्या वाट्याचंही मलाच मिळू दे .अशी माणसं काय कायम असंतुष्ट असतात.एखाद्या ब्रँडची कॉपी करून, एखाद्या औषधांमध्ये भेसळ करून, दुधात, धान्यात भेसळ करून पैसे कमावतात. ही नीच माणसं आणि यांच्या या वृत्तीला काय म्हणावं? शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानामध्ये टक्केवारी,घरकुल मध्ये टक्केवारी, एवढंच नव्हे तर पवित्र मठ मंदिर असतात त्यांच्या बांधकामांमध्ये देखील पैसे खाण्याचे प्रकार घडत आहेत. काही काही ठिकाणी तर पवित्र अशा मंदिरामध्ये पुजारी आणि ट्रस्ट मंडळी यांच्या संगनमताने पैसे उकळण्याचा धंदा चालू असतो. देशाचे भविष्य असणाऱ्या खेळाडूंचे क्रीडा साहित्य, मैदान बांधकामांमध्ये देखील पैसा मारला जातो. खरं तर आपण कोणत क्षेत्र लुटायचं सोडल आहे हो? एवढंच नव्हे तर शेतकऱ्याने अपार कष्टाने पिकवलेल्या शेतमालामध्ये देखील काटा मारतात.. या नराधाम प्रवृत्तीला म्हणायचं तरी काय? आता सध्या परिस्थितीमध्ये लोकांची प्रवृत्तीच अशी झाली आहे की एखाद्याकडून काही घ्यायचं तर जोर लावून घ्यायचं पण आपल्याला जेव्हा देण्याची वेळ येते तेव्हा टाळाटाळ करायचं हे बरोबर आहे का?

खरंतर बहुतांश राजकारणी मंडळी ही एकदा दोनदा निवडून येऊन कोट्यावधी रुपयाची माया जमवतात. सरकारी नोकरदार यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला सरकार देत असतो. त्यातून त्याचे चरितार्थ उत्तम प्रकारे चालू शकते. ते काही त्या पैशातून खरेदी करू शकतात हा त्यांचा अधिकार आहे. पण काही सरकारी नोकरदारांची संपत्ती ही एखाद्या उद्योगपतीच्या बरोबरीची होऊन जाते. इतरही काही क्षेत्रातील मंडळी ही अनैतिक मार्गाने जनतेला लुबाडून अमाप पैसा कमवत असतात. यामुळे होते काय तर जो प्रामाणिक राजकारणी असतो,जो प्रामाणिक नोकरदार असतो,जो प्रामाणिक समाज बांधव असतो त्याच्या मनामध्ये कळत नकळत एक भाव निर्माण होतो की, तो म्हणजे आपण तरी प्रामाणिक राहून उपयोग काय? इतके सारे मिळून आपल्या देशाला ओरबाडत आहेत मग आपण थोडं ओरबाडल तर फरक काय पडेल? वरील प्रकारच्या या साऱ्या भ्रष्ट प्रवृत्तीतून आपल्या देशामध्ये सर्वच बाबतीमध्ये महागाई प्रचंड प्रमाणात वाढत आहे आणि त्याचा फटका हा सर्व क्षेत्रातील गोरगरीब,प्रामाणिक माणसांना बसत आहे हे मात्र खरं. यातून आपल्या या प्राणप्रिय भारत मातेचे अतोनात नुकसान आपण करत आहोत, हे मात्र आपण सारे पद्धतशीरपणे विसरत आहोत.

**शब्दांकन.**
**श्री. मारुती देविदास शिंदे.**
**मु. पो. वागदरी. तालुका. अक्कलकोट.**
**मो.७०८३५६३६५९**

# सोलापुरात उद्या पत्रकारांसाठी कार्यशाळा

# तीन सत्रांमध्ये होणार तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्रे संकुल आणि सोलापूर श्रमिक पत्रकार संघ तसेच जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २० जुलै २०२५ रोजी सात रस्ता येथील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आधुनिक पत्रकारिता आव्हाने आणि संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी १०:३० वाजता इंडिया टुडे, मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजित कारंडे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी दै. संचारचे संपादक धर्मराज काडादी, दै. सुराज्यचे मुख्य संपादक राकेश टोळ्ये, दै. दिव्य मराठीचे निवासी संपादक महेश रामदासी, दै. पुण्यनगरीचे वृत्तसंपादक रघुवीर शिराळकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

त्यानंतर प्रथम सत्रात इंडिया टुडे, मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजित कारंडे यांचे मार्गदर्शन होणार असून अध्यक्षस्थानी दै. तरुण भारत संवादचे निवासी संपादक विजयकुमार देशपांडे हे राहणार आहेत. सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चासत्रात मुंबई तकचे वरिष्ठ पत्रकार निलेश झालटे, दै. लोकमत सोलापूरचे निवासी संपादक मिलिंद कुलकर्णी, दै. पुढारीचे सहायक निवासी संपादक संजय पाठक हे मार्गदर्शन करणार आहेत.

समारोप सत्रात पुणे विभागीय माहिती विभागाचे उपसंचालक डॉ. किरण मोघे आणि मुंबई येथील प्रसिद्ध मुक्त पत्रकार प्रशांत कदम यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ. लक्ष्मीकांत दामा हे या समारोप सत्राचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

याप्रसंगी केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दै. सकाळचे सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील, अपूर्वाईचे संपादक डॉ. रवींद्र चिंचोलकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या एकदिवसीय कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी आणि पत्रकारांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व पत्रकार आणि पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे संकुलचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, विद्यापीठाच्या जनसंज्ञापन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे , खजिनदार किरण बनसोडे यांनी केले आहे.

### नेता... कार्यकर्ता.

नेता करतो राजकारण
करून स्वतःची मज्जा...
त्याचा कार्यकर्ता मात्र नेत्यासाठी
भांडण करून
नंतर भोगतात सजा.....

नेता चाखतो यांनचा
गोड स्वाद अमृताचा
कार्यकर्ता नेहमी
चाखतो स्वाद मूर्खपणाचा....

इतकं होऊन पण आमच्या
कार्यकर्त्याची कॉलर असते ताठ
काय करणार तो, त्याच्या गळ्यात
असते गुलामीची बांधलेली
गाठ...

कार्यकर्त्या साठी यांचा
नेता खाईल का ओ मार
कार्यकर्ता सारखाच झेलेल का
हा नेता पाठीवर वार

– संघरत्न घनघाव
८८३०३११८२२

# पोलीस प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित, आठ दिवसात कारवाई न केल्यास पून्हा आंदोलन; रिपाइंचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : पुरंदर तालुक्यातील सासवड व पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व प्रकारचे अवैद्य धंदे बंद करण्यात यावेत या मागणीसाठी सोमवार दि. १४ / ७ / २०२५ ते बुधवार दि. १६ / ७ / २०२५ असे सलग तीन दिवस उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग सासवड यांच्या कार्यालयासमोर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांच्या वतीने बेमुदत आंदोलन सुरु होते, उपविभागीय अधिकारी भोर विभाग तानाजी बरडे सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाघचौरे व रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी यांच्यात दोन्ही पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व प्रकारचे अवैद्य धंदे बंद करणे बाबत, सविस्तर चर्चा करण्यात आली, पोलीस प्रशासनाच्या वतीने, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांनी सासवड पोलीस स्टेशनने १ जानेवारी २०२५ ते १५ / ७ / २०२५ पर्यंत अवैद्य दारुच्या एकूण ४१ केसेस करुन १,४१ ,७१५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अवैद्य जुगार १८ केसेस केल्या असून, यामध्ये १, ४८ , ७४३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.व एनडीपीएसच्या ४ केसेस ४ व्यक्तींवर केल्या आहेत तर जेजुरी पोलीस स्टेशनने अवैद्य दारुच्या ३८ केसेस केल्या असून, एकुण २, ४१,५६८ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे अवैद्य जुगारीच्या ८ केसेस केल्या आहेत यामध्ये, १६१३१रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे, एनडीपीएस च्या ६ व्यक्तींवर कारवाई करण्यात आल्याची माहिती दिली, या तुटपुंज्या कारावाईवर रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करुन सासवड व जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील गांजा जुगार मटका, ऑनलाईन मटका, चक्री हातभट्टी, यांची सद्यस्थितीत सुरु असलेल्या अवैद्य धंद्याची यादी देऊन , उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर अवैद्य दारु,गांजा जुगार चक्री धंदे जोरात सुरु आहेत, ते बंद करा, हॉटेल तहयाती हॉटेल मैफील,हॉटेल सिंडीकेट येथील हुक्का बंद करा व जेजुरी व सासवड पोलीस हद्दीतील मटका चक्री ऑनलाईन मटका,अवैद्य दारु जुगार गांजा हे सर्व धंदे आठ दिवसात बंद न केल्यास पुन्हा आंदोलन करु असा इशारा रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी पोलीस प्रशासनास दिला, आठ दिवसात सर्व अवैद्य धंदे बंद करण्यात येतील असे आश्वासन दिल्यानंतर रिपब्लिकन पक्षाने आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे तालुका अध्यक्ष अविनाश भालेराव रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, तालुका कार्याध्यक्ष सुधीर शेलार रिपब्लिकन पक्षाचे युवक अध्यक्ष स्वप्निल पाटोळे रिपब्लिकन पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सचिन कांबळे सामाजिक कार्यकर्ते सुनिल जगताप पुरोगामी संघर्ष परिषदेचे युवक अध्यक्ष मनोज भिसे यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

अवैद्य धंद्या विरोधातील लढा शेवट पर्यंत लढू असे विष्णूदादा भोसले यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांना ठणकावून सांगितले.




# 'निसर्ग मैत्री ग्रुप'स्थेतर्फे इवा वर्ल्ड स्कूल कल्याण पश्चिम येथे वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण/बाळासाहेब अहिरे : महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र व एक पेड मा के नाम या शासनाच्या उपक्रमा अन्वये माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण राज्यात १० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट सर्व प्रशासकीय यंत्रणा तसेच सर्वसामान्य नागरिकांसमोर ठेवले आहे.

निसर्ग मैत्री ग्रुप ,कल्याण पश्चिम यांचे वतीने इवा वर्ल्ड स्कूल, आरटीओ जवळ, कल्याण पश्चिम येथे तिसरे वृक्षारोपण करण्यात आले. तेथे २५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

निसर्ग मैत्री ग्रुप या संस्थेमार्फत आतापर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आंबिवली बायोडायव्हर्सिटी पार्क, आंबिवली व साधना आधार वृद्ध सेवा केंद्र डोंबिवली, या ठिकाणी आतापर्यंत एकूण १०० झाडांची लागवड करून शासनाच्या उपक्रमात खारीचा वाटा उचललेला आहे.

सदर कार्यक्रमास ॲड. शलाका अहिरे, ॲड. मीनल इनामदार, ॲड. शशांक देशपांडे, ॲड रंजना म्हात्रे, ॲड. सुनीता देवरे, ॲड. दीपश्री वंटमुरे, ॲड. तबस्सुम बैरागदार, ॲड.अनुप्रिया देशमुख, ॲड. अनुष्का अहिरे, ॲड. मयुरेश आठवले तसेच इवा वर्ल्ड स्कूल या शाळा प्रशासनाचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# संविधानिक लाभ मिळवून घेण्यासाठी ओबीसी समाजाची एकजूट महत्वाची : नुरखाँ पठाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य आयोजित चौथ्या ऑनलाइन राज्यस्तरीय विचार बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक तथा प्रचारक आदरणीय नूरखा पठाण सर यांनी ओबीसीसाठी असलेल्या संविधानिक तरतुदी, ओबीसी आरक्षणासाठी नेमलेले विविध आयोग अगदी काका कालेलकर आयोगापासुन ते बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या मंडल आयोगाच्या शिफारशी पर्यंत सविस्तर माहिती दिली.ओबीसी समोरील भविष्यातील आव्हाने ओबीसी चे आजचे वास्तव वर्तमानातील स्थान यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले . घटनेतील तरतुदीनुसार अजुनही ओबीसी बहुजन समाजाला त्यांचे फायदे मिळाले नाहीत, लोकसंख्या व जातीनिहाय जनगणना झाली तर अनेक प्रश्न सुटणार आहेत.यासाठीचा जनमताचा रेटा आवश्यक आहे.ओबीसी समाज हा उतरंडी उतरंडीमध्ये जातीच्या उतरंडीमध्ये मधल्या स्थानावर असल्याने आणि या प्रवर्गात अनेक जातींचा समावेश असल्याने त्याचबरोबर विविध धर्मातही ओबीसी प्रवर्ग ओबीसींच्या जाती असल्याने या जात समूहाचं संघटन होऊन प्रवर्गाची भाषा या समूहांना बोलणं गरजेचं आहे तरच या प्रवर्गाचे असलेले लाभ या समूहाला मिळतील असे प्रतिपादन संविधान अभ्यासक तथा प्रचारक दुर्गा पठाण यांनी केले या सभेमध्ये राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले,राज्य सरचिटणीस तथा माळी विकास मिशन महाराष्ट्र च्या शिक्षण प्रसार समिती चे राज्य समन्वयक श्री.संतोष भोजने,प्रदेश कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, प्रदेश प्रतिनिधी राजेंद्र खैरनार, रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नाचपल्ले,लातूर जिल्हाध्यक्ष हिरालाल पाटील,हिंगोली जिल्हाध्यक्ष लहू राक्षे, महिला प्रदेशाध्यक्ष रेखाताई सुडे, अमरावती महिला जिल्हाध्यक्ष प्रीती ताई आर्डड ,नांदेड महिला जिल्हाध्यक्ष सारिका अच्मे हिंगोली धाराशिव जिल्हाध्यक्ष आनंद फुलसुंदर, सांगली जिल्हाध्यक्ष अरुण जाधव, यवतमाळ येथुन राहुल पाचघरे, जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर तिखे, नांदेड जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण वडमिले,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# वन्यजीवांना उत्तम दर्जाचे पाणवठे बांधून देण्याची आ. समाधान आवताडे यांची मागणी

## पाणवठे कायमस्वरूपी टिकण्यासाठी सरकारने तालुकास्तरीय समितीची स्थापना करावी; आ. आवताडेंची लक्षवेधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, वन्यजीवांसाठी पाणी पिण्याची योग्य सुव्यवस्था करण्याकरिता हे पाणवठे वनविभागाच्या हद्दीत उभारण्यात येऊन ते कायमस्वरूपी टिकण्यासाठी सरकार तालुकास्तरीय समितीची स्थापना करणार आहे का? याबाबत आमदार आवताडे यांनी उपप्रश्न उपस्थित करून सभागृहाचे व मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.



सदर मागणी मांडताना आ आवताडे यांनी सांगितले की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील मंगळवेढा तालुका पाण्याअभावी दुष्काळी तालुका म्हणून गणला जातो. अगदी जानेवारीपासूनच नागरिकांना व जनावरांना पाण्याच्या शोधात मोठी भटकंती करावी लागत असते. अशा परिस्थितीमध्ये तालुक्यातील मारोळी येथे दोन तरस प्राणी पाण्यासाठी जंगला बाहेर आले असता नाहक त्रासापोटी भयभीत झालेल्या नागरिकांनी हल्ला होण्याच्या भीतीपोटी त्यातील एक तरस ठार केला.त्यातील एकाला आपला प्राण अनेक जंगलातील हरीण, मोर तसेच इतर सदर वन्यजीव प्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधात सर्वदूर फिरत असतात त्यामुळे त्यांचा आकस्मित अपघात होतो व प्रसंगी त्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. अशा सर्व बाबींचा शासनदरबारी संवेदनशील मार्गाने विचार करुन लवकरात-लवकर नियोजित पाणवठे निर्माण करुन त्यामध्ये कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी आ आवताडे यांनी केली आहे.

सामाजिक व सांप्रदायिक कार्य सेवेसाठी केंद्रस्थानी असणाऱ्या मंगळवेढा येथील वारी परिवाराचे व त्यांच्या सेवाभावी कार्याचे देखील आ समाधान आवताडे यांनी भर सभागृहात कौतुक केले आहे. काळ्या शिवारातील पक्षांना उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी वारी परिवार अहोरात्र झटून त्यांची सोय करत असतात. त्याचबरोबर आदर्श परिवाराचाही सामाजिक क्रियाशील बद्दल आमदार आवताडे यांनी विशेष उल्लेख केला आहे.

सदर मुद्द्यावर सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी वन्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधून गरजेनुसार वनबंधारे बांधून त्याच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी वन खाते घेईल, असे आश्वस्त केले.

> **गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक सेवेचा वसा आणि वारसा जतन करण्यासाठी मानवी व इतर सजीव जीवनमूल्यांशी निगडीत सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून वारी परिवार एकदिलाने लोकाभिमुख कार्य करत आहे. अशा आमच्या प्रामाणिक कार्याची दखल घेऊन आमदार समाधान आवताडे यांनी राज्याच्या विधीमंडळात आमच्या कार्याचा उल्लेख केल्याने आम्हाला सार्वजनिक जीवनात आणखी मोठे कार्य करण्यासाठी मोठी चालना आणि प्रोत्साहन प्राप्त झाले आहे**
>
> **– सतिश दत्तु, संस्थापक वारी परिवार मंगळवेढा.**

# इंदापूरच्या आश्रमशाळेत अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन





इंदापूर ता. प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना ५६ व्या स्मृतिदिनानिमित्त भिमाई आश्रमशाळेत अभिवादन करण्यात आले. यावेळी मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात संस्थेचे कार्याध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राज्याचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ते ड.राहुल मखरे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठेंच्या प्रतिमेला पुष्पहार तर तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीस व माजी नगराध्यक्ष, संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वैष्णवी गायकवाड, श्रेया पाटील या विद्यार्थीनींची भाषणं झाली. तसेच शिक्षिका मनिषा जगताप – मखरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला आपल्या मनोगतातून उजाळा दिला. यावेळी संस्थेचे सचिव ड. समीर मखरे,मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे,उपप्राचार्या सविता गोफणे, सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन नानासाहेब सानप यांनी केले.

# एक पेड मां के नाम अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : एक पेड मा के नाम ही व्यापक वृक्षारोपण मोहीम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रारंभ करण्यात आली आहे.



मनपा डिजिटल स्कूल नंबर २८ स्कूल येथे वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

यावेळी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष तथा पत्रकार श्री देविदास माने, दिनेश जावगडे मुख्याध्यापक परमेश्वर सुतार तसेच मनपा डिजिटल स्कूल नंबर २८ शाळेतील मुलांच्या उपस्थितीत हरित दिनानिमित्त शाळेत वृक्षारोपण करण्यात आले शाळेतील मुलांनी जवळपास ८८ रोपांची लागवड केली. या उपक्रमास उदंड प्रतिसाद मुलांनी व पालकांनी दिलेला आहे या लावलेल्या रोपांची छायाचित्रे शासनाच्या अमृत वृक्ष या पवर फोटो देखील अपलोड करण्यात आले आहे असे मुख्यालय कोणी नमूद केले आहे.

**मनपा डिजिटल स्कूल नंबर २८ आयोजन**

सदर उपक्रमाची जनजागृती करण्यात येत आहे यावेळी गौरशंकर नारायणे व महिला शिक्षिक वर्ग यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वखरे येथील डिझाईन मधील बी. डीझ पदवी बद्दल करिअर मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गुरुवार दिनांक १७/०७/२०२५ रोजी एमआयटी विश्व प्रयाग विद्यापीठ, श्री वैदिक खरे यांनी एमआयटी ज्युनिअर कॉलेज वाखरीच्या इयत्ता बारावी विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सेमिनार आयोजित केले होते.

या सेमिनारमध्ये एमआयटी विश्व प्रयाग विद्यापीठ द्वारे चालवल्या जाणाऱ्या डिझाईनिंग प्रोग्रॅम बद्दल विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. हे सेमिनार विद्यार्थ्या साठी खूपच संवादात्मक होते. त्यांना व्हिडिओ दाखवून संजीव निर्जीव वस्तूंचा डिझाईनिंग कशी केली जाते याची मार्गदर्शन केले भविष्यात डिझायनिंग आणि डिझाईन कोर्सला देशात जगात ही खूप मागणी असेल डिझाईन कोर्समध्ये सर्वजणशीलता आणि तांत्रिक कौशल्य किती महत्त्वाची भूमिका बजावतात याची मार देखील विद्यार्थ्यांना सांगितले.





फॅशन उत्पादन व ग्राफिक्स इंटरनेट डिझाईन मधील डिझाईन ची डिझाईन उद्योगात गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक जगातील उदाहरणे देण्यात आली. डिझाईनिंग कोर्स हे चांगले भविष्य घडविण्यासाठी त्यांना कशी मदत करतो हे स्पष्ट केले गेले आहे. यावेळी हेडमिस्ट्रोस सौ शिवानी बॅनर्जी प्राचार्य डॉक्टर स्वप्निल शेठ तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

**तहसिलदार यांना दिले निवेदन**

**शासनाने पारित केलेले जनसुरक्षा विधेयक त्वरित मागे घेण्यात यावे; रिपाइंच्या वतीने मागणी**

# तुळजापूर येथे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने जाहीर निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : मराठा सेवा संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर जो भ्याड हल्ला झालेला आहे त्याचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने निषेध करून माथेफिरू आरोपी असलेला दीपक काटे याला शिक्षा देण्यात यावी असा आशयाचे तहसीलदार तुळजापूर यांना निवेदन दिले आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने पारित केलेले जनसुरक्षा विधेयक त्वरित मागे घेण्यात यावे, अशी मागणी देखील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आली आहे. दिलेल्या मागण्या मान्य न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया उग्र आंदोलन करेल असा इशाराही निवेदनात दिला आहे.

तहसिलदार तुळजापूर याना देण्यात आलेल्या निवेदनावर मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष तानाजी कदम संजय शितोळे रोजगार आघाडी महाराष्ट्र उपाध्यक्ष, प्रकाश कदम तालुकाध्यक्ष, अरुण कदम शहराध्यक्ष, विक्रांत हावळे तालुका उपाध्यक्ष, विष्णू सोनवणे युवक तालुका अध्यक्ष अमोल कदम युवक शहराध्यक्ष, अशोक कांबळे सल्लागार, धम्मशील कदम तालुका संपर्कप्रमुख, आप्पा कदम रोजगार आघाडी अध्यक्ष रवि वाघमारे रोजगार आघाडी शहराध्यक्ष तानाजी डावरे महादेव सोनवणे दाजी माने तालुका उपाध्यक्ष राज कदम सुशील कदम श्रीमंत चंदनशिवे ज्ञानदेव कदम चोकोबा शिरसाट चंचल कदम चेतन सोनवणे अविनाश भगत झुंबर चंदनशिवे दत्ता हावळे विकास कदम अशोक देशमुख हिरा सोनवणे शरणाथ कदम आदींच्या सह्या आहेत.

यां प्रसगी आरपीआयचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बाळासाहेब भिसे यांना राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडीचे चिखली शहराध्यक्ष बाळासाहेब भिसे सामाजिक व राजकीय कर्तृत्वावर आपली एक वेगळी कामगिरी सामाजिक कार्याला प्रथम स्थान देत गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करत आहे.नुझुल च्या जागेचे लोकांचे प्रश्न असतील सामाजिक अडचणी असेल सामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी नेहमीच समोर येऊन न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो यापलीकडे जाऊन त्यांचा विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.त्यांनी सामाजिक बांधिलकी कधी सोडली नाही.बहुजन महापुरुषयांच्या समतावादी विचाराचा जागर करत निःस्वार्थ राजकारण निर्गवी पणा जमिनीवर पाय ठेऊन वावरणे जनसामान्यांच्या सुखदुःखाची घट्टपणे नाळ समाजातील ज्वलंत प्रश्नांवर निर्भीडपणे तोंड देऊन जनसामान्याला न्याय मिळवून देण्याची नेहमी प्रयत्न यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत ऋणानुबंध समाज विकास संस्था यांच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्कार जाहीर केला आहे लवकरच सदर पुरस्काराचे वितरण चिखली येथे केले जाणार असल्याचे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले.



## थोडक्यात...

### मोलकर्णीच्या पगारासाठी पतीने केली पत्नीस मारहाण; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नी सासरे नांदत असताना पतीसह तिच्या सासरकडच्या मंडळींनी शिवीगाळ करून मोलकर्णीच्या पगारासाठी माहेरून पैसे आणण्यात शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण केल्याची फिर्याद सनाफातिमा जुबेर जहागीरदार (वय-२१-,रा.रामवाडी) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती जुबेर सासू नाझीम राहणार दर्गा रोड भिवंडी, ठाणे पतीची मामी परवीन कलकत्ते, (रा.देवळा-ली कॅम्प नाशिक) व नणंद मेहजबीन जईद कादरी (रा.भिवंडी,मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १६ नोव्हेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी भिवंडी मुंबई येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चौधरी हे करीत आहेत.

### कर्जासाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता या सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी मिळून कर्ज फेडण्यासाठी पाच लाख रुपये व तीन तोळे सोने घेऊन ये असे म्हणून शिवीगाळ करून मारहाण केली.तसेच मानसिक व शारीरिक छळ करत उपाशीपोटी ठेवून जाचहाट केल्याची फिर्याद प्रांजली शुभम आवटे (वय-२४,रा. रक्षक पार्क, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती शुभम,सासू सुवर्णा,सासरे केदारनाथ,दिर योगीनाथ,व नितीन (सर्व.रा. साई पार्क दहिटणे,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना २७ डिसेंबर २०२० ते मार्च २०२५ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी दहिटणे येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

### डॉक्टर उपाधी लावून प्रशासनाचे फसवणूक

सोलापूर (प्रतिनिधी) डॉक्टर उपाधी लावून सामान्य नागरिक व प्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १७ जुलै रोजी कुमठा नाका येथे घडली.याप्रकरणी डॉक्टर प्रसाद मरिअप्पा कुमार (नेमणूक मुख्य वैद्यकीय अधिकारी महापालिका सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तुषार देवेंद्रनाथ रॉय (वय-४२,रा.गंगाधर नगर,एमआयडीसी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी याने त्याची वैद्यकीय व्यवसायाकरिता शैक्षणिक पात्रता नसल्याने व तसेच नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक नसल्याने बेकायदेशीर वैद्यकीय व्यावसायिक प्रॅक्टिस करून ते डॉक्टर उपाधी लावून सामान्य नागरिक व प्रशासनाची फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे हे करीत आहे.

# पंढरपूरातील २१३ सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरे : उपमुख्यमंत्री अजित पवार

## ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित : उपमुख्यमंत्री अजित पवार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे.या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. त्यासाठी ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते.

पंढरपूर शहरातील सफाई कामगारांना घरे देण्याच्या प्रकल्पामध्ये एकूण १३ इमारती आणि २१३ रहिवासी युनिट आहेत. या १३ इमारतींपैकी १२ इमारती ४ मजली असून, एक इमारत ५ मजली आहे. त्यामध्ये रस्त्यालगत असलेल्या ७ इमारतींमध्ये २४ दुकानांचे गाळे आहेत. या सफाई कामगारांना लवकरात लवकर घरे देण्याच्या दृष्टीने आजच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल आणि त्यांना योग्य ते निर्देश देण्यात येतील. या सफाई कामगारांच्या प्रलंबित घरांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येईल आणि त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी श्रावस्ती बुद्ध विहारच्या वतीने साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव/प्रतिनिधी : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी श्रावस्ती बुद्ध विहार, पिंपळे गुरव यांच्या वतीने मोठ्या उत्साहात, सामाजिक जागृतीने व आदरभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, साहित्य, समाजप्रबोधन आणि दलित समाजासाठी त्यांनी उभारलेल्या संघर्षाविषयी विचारमंथन करण्यात आले. त्यांच्या लेखनातून समाजात जो प्रकाश पडला, तो आजही प्रेरणादायी आहे, असे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात श्रावस्ती बुद्ध विहारचे संस्थापक अध्यक्ष श्री. कैलास गहिनीनाथ बनसोडे यांनी अण्णाभाऊ साठे यांचा सामाजिक संदेश उपस्थितांसमोर ठेवला.

अण्णाभाऊ साठे हे श्रमिक, शोषित आणि उपेक्षितांच्या हक्कांसाठी झगडणारे महान लोकशाहीर होते. आजच्या काळात त्यांच्या विचारांची जास्त गरज आहे. त्यांच्या लेखणीने जी क्रांती घडवली, ती आजच्या पिढीने पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे.

या कार्यक्रमात श्रावस्ती बुद्ध विहारचे अनेक सदस्य उपस्थित होते. आगंदा चव्हाण, आनंद साळवे, राजेंद्र भालेराव ,शारदा गायकवाड, आशा चव्हाण, रंगूबाई शेलार, सीमा लोंढे, कांता सोनवणे, उमा कांबळे, लीला डावरे, कस्तुराबाई कडाले, प्रतिभा मोर, दीपा शेंडगे, लता सुरवसे, मायाताई रणवरे, निशा लोंढे, आगंदा चव्हाण यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सदस्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची शपथ घेतली. सामाजिक समतेचा संदेश पोहोचवण्याचे आणि संविधानिक मूल्यांनुसार कार्य करण्याचे वचन देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली,कार्यक्रमाला सुरेखा बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रावस्ती बुद्ध विहारचे सर्व सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी मोलाचे योगदान दिले.

# भाजपा कळंब तालुका उपाध्यक्षपदी अॅड. रामराजे जाधव यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक मजबुतीसाठी कळंब तालुका उपाध्यक्षपदी कन्हेरवाडीचे सरपंच ड .रामराजे जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे हि नियुक्ती तुळजापुरचे आ . राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, आ.सुजितसिंह ठाकुर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पक्षाची ध्येय धोरणे तळागळातील जनतेपर्यंत पोहोचविणे, संघटनात्मक बांधणी बळकट करणे व लोक संपर्क वाढवणे या दृष्टीने नवीन पदाधिकारी यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी नियुक्ती पत्रात म्हटले आहे की नवीन उपाअध्यक्षानी पक्षाच्या मूलभूत विचारधारेचा प्रसार करताना पारदर्शक व विश्वासार्ह नेतृत्व उभे करावे तसेच कार्यकर्त्यांमध्ये एक संघटणा व सक्रियता वाढवून पक्ष संघटनेला भक्कम करण्यासाठी त्यांनी सातत्याने मेहनत करावी या नियुक्ती मुळे कळंब परिसरातील भाजप संघटना अधिक मजबूत होईल आणि आगामी राजकीय वाटचालीसाठी ठोस पाया तयार होईल असा विश्वास पक्षातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे तसेच कन्हेरवाडी ग्रामस्थांच्या वतीने जंबो सत्कार करण्यात आला यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यात आणि ग्रामीण भागात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सिन्नर तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा निर्धार : कृष्णाजी भगत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय काम करीत असून , सिन्नर तालुका मोतीबिंदू मुक्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांनी केले .

सायाळे च्या श्री. डी. एस. शिंदे जनता विद्यालय येथे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार रुग्णालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते .शालेय समितीचे अध्यक्ष वसंत शिंदे यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले .

यावेळी व्यासपीठावर डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संशोधन केंद्राचे डॉ. रवींद्र सोनवणे विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश गरुड, सायाळे गावचे सरपंच विकास शेंडगे, मविप्र सभासद रामनाथ बारहाते गुरुजी, अण्णासाहेब शेंडगे, शुक्लेश्वर शिंदे, अशोक चासकर, भाऊसाहेब शिंदे, मच्छिंद्र चासकर, दिलीप गोरे, शिवाजी शिंदे, तान्हाजी शिंदे आदी सदस्य उपस्थित होते.

आवश्यक रुग्णांना मोफत औषधोपचार करण्यात आला . बिन टाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येणार आहे. याप्रसंगी सूत्रसंचालन मोहिनी यादव यांनी तर आभार प्रदर्शन संदीप पगार यांनी केले .शिबिर यशस्वी होण्यासाठी सीमा देशमुख, शैला ढुस, मंगल कोकाटे, रोहिणी पाटील, ललिता होळकर, सोनाली पोटे, दिग्विजय पाटील, धनाजी गायकवाड, दिपाली गारे, नारायण राहणे, विकास सोनवणे, दत्ता शिंदे या सर्वांचे सहकार्य मिळाले.

**सायाळे विद्यालयात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मंत्रालयातून निर्णय

# गौण खनिज बेकायदेशीर उत्खनन व वाहतूक प्रकरणी राज्य शासनाची कडक भूमिका - सर्व संबंधित विभागांची संयुक्त जबाबदारी निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मंत्रालयातून एका महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून, राज्यातील गौण खनिज म्हणजेच वाळू, मुरुम, गिट्टी इत्यादींच्या बेकायदेशीर उत्खनन व वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस, परिवहन, जलसंपदा आणि महसूल विभाग यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी वारंवार केलेल्या पाठपुराव्यानंतर शासन स्तरावर ही कारवाई झाली असून, त्यांना शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेली पत्रे आणि अहवाल याचे प्रत्यंतर आहे.

दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी गृह विभाग, मुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव आणि महसूल व वन विभागाकडून ऑनलाईन प्रणालीद्वारे पत्र व्यवहार करण्यात आला होता. यामध्ये चंद्रकांत खरात यांनी सादर केलेल्या अर्जातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये मांडलेल्या मुद्द्यांचा विशेषतः विचार करण्यात आला.

**चंद्रकांत खरात यांनी सांगितले की, राज्यात वाळू माफियांना रोखण्यासाठी मी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहे. आता शासनाने सर्व विभागांची जबाबदारी निश्चित करून हा लढा बळकट केला आहे. पुढील टप्प्यात आम्ही याची अंमलबजावणी कशी होते, यावर लक्ष ठेवणार आहोत.**

त्यानंतर दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णयान्वये नवीन वाळू धोरण निश्चित करण्यात आले असून, त्यात बेकायदेशीर उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी विविध उपाययोजना आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. सदर निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

यापूर्वी लोक आयुक्त मुंबई यांच्या कडे दाखल केलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित कार्यवाही बाबत सविस्तर अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार १३ जून २०२५ रोजी मराठीतील अहवाल टपालाने पाठविण्यात आला होता आणि आता त्याच अहवालाची इंग्रजी प्रत तसेच धोरणात्मक माहिती पुन्हा एकदा संलग्न करून, डॉ उमेश राठोड (कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या मार्फत दिनांक ८ जुलै २०२५ रोजी पाठविण्यात आलेली आहे.या घडामोडीमुळे राज्यात बेकायदेशीर वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर गंडांतर येण्याची शक्यता असून, प्रशासनाची जबाबदारी आता अधिक स्पष्टपणे निश्चित झाल्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहे.

# शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्न पहा, यश सदैव तुमचंच आहे : मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुरबाड/प्रफुल्ल शेवाळे : प्रियजन गुण गौरव समिती मुरबाड आणि राष्ट्रवादी काँग्रेस मुरबाड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने यावर्षी दहावी आणि बारावी च्या परीक्षेमध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी वर्गाचा सत्कार समारंभ मुरबाड येथील MIDC हॉल येथे पार पडला.

यावेळी सदर कार्यक्रम करिता मुख्य अतिथी म्हणून ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दहावी आणि बारावी परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करीत असताना रोहन घुगे म्हणाले की, मी सुद्धा तुमच्या मधला च एक सामान्य विद्यार्थी म्हणून वावरलो आहे. आपल्या आगामी आयुष्याकरिता शिक्षणाचे एक ध्येय निश्चित करा. शिक्षणाच्या माध्यमातून खरोखर मोठी स्वप्न पहा, दूरदृष्टी ठेवा आणि यातून भव्य दिव्य यश नक्कीच तुमच्या पदरात पडल्या शिवाय राहणार नाही. डॉ. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्ती आज सुद्धा तुम्हाला आम्हाला पुस्तकामधून भेटत आहेत. विद्यार्थी मित्र मैत्रिणीनो स्वतःला ओळखा आणि शिक्षणाच्या भव्य दिव्य वाटेवर चालत राहा असा मोलाचा सल्ला श्री. घुगे यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाला दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करीत म्हटलं की, पुढारी कमी व्हा, अधिकारी जास्त व्हा.. आपल्या देशात शिक्षणाचे दालन खूप मोठं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलं आहे की शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. याचं धर्तीवर शिक्षणाचे मोल ओळखा आणि पुढे चालत राहा. आपल्यामधील विदयार्थी वर्गाला पुढे उच्चं शिक्षण, उच्चं पदस्थ अधिकारी होण्यासाठी पाहिजे ती मदत करण्याचा आमचा मानस असणार आहे.

यावेळी उपस्थित एका विद्यार्थीनी ने आपलं मनोगत व्यक्त करताना म्हटलं की हा आजचा आमचा सन्मान, प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह हे सारं काही उद्याची आमची जबाबदारी वाढवणारे, आयुष्याची उंची वाढवणारे एक आधारस्तंभ आहे.

या सोहळ्याचे मुख्य अतिथी मा.श्री.रोहन घुगे (खड) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे तर अध्यक्षस्थानी मा. श्री. प्रमोद हिंदुराव (उपाध्यक्ष, रा. कॉ. पार्टी, महाराष्ट्र राज्य) होते.

यावेळी ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री.भरत भाऊ गोंधळे, प्रदेश सचिव रविंद्र परटोले, युवक जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, महिला जिल्हाध्यक्ष सौ. कल्पनाताई तारमळे, मीडिया सेल जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, मुरबाड तालुका अध्यक्ष चंद्रकात बोष्टे, कल्याण ग्रामीण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, अरुण जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होते.